**Publication / Language: Loksatta / Marathi**

**Headline: Gold’s static rates would boost buying**

**Edition: Mumbai**

**Date: 4th November, 2010**

**Coverage –**

धनत्रयोदशी



# सोन्याचा स्थिरावलेला भाव, खरेदीला बळ देणारा!

मुंबई, ३ नोव्हेंबर/ व्यापार प्रतिनिधी

सोने-चांदीसारख्या मौल्यवान धातूंच्या खरेदीसाठी रांगा लागाव्यात असे विलक्षण चित्र मुंबईच्या सराफ बाजाराचे हृदय समजल्या जाणाऱ्या झवेरी बाजारमध्ये आज धनत्रयोदशीच्या दिवशी दिसून आले. मुख्यतः किरकोळ विक्रेते, स्टॉकिस्ट आणि जवाहिरांची अलीकडे मागणी वाढलेल्या सोन्या-चांदीची नाणी खरीदण्यासाठी झुंबड लागल्याचे चित्र होते. गेल्या वर्षाच्या तुलनेत सोन्याचा भाव तब्बल ३० टक्क्यांच्या घरात वधारला असला तरी ऐन दिवाळीच्या तोंडावर सोन्याच्या भावाला बसलेला लगाम खरेदीला स्फुरण चढविणारे ठरले आहे.

ऐन धनत्रयोदशीच्या दिवशी चांदीने आपली रेकॉर्ड ब्रेक घोडदौड कायम ठेवली आणि कालच्या तुलनेत किलोमागे चांदीचा (.९९९ शुद्धतेच्या) भाव २२५ रुपयांनी वाढून रु. ३८,२४० वर स्थिरावला. चांदीने कालच विक्रमी रु. ३८,००० पुढे झेप घेतली होती. सोन्याचा भाव मात्र गेले दोन आहे त्या स्तरावर स्थिरावला आहे. आज सराफ बाजारात झालेल्या व्यवहारात स्टँडर्ड सोन्याचा (९९.५ टक्के शुद्धता) भाव १० ग्रॅमला कालच्या तुलनेत १० रुपयांनी खाली रु. १९,६४५ असा होता. २४ कॅरट शुद्ध सोने (९९.९ टक्के शुद्धता) कालच्याच स्तरावर प्रति १० ग्रॅम रु. १९,७४५ असा जैसे थे होता. सोन्याच्या भावातील विक्रमी झळाळी पाहता, सोने खरेदी ही आता जनसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेली आहे, याची कबुली अखिल भारतीय सराफा बाजारचे अध्यक्ष शील चंद जैन यांनी दिली. सोने नाही तर चांदीकडे ग्राहकांचा होरा वळतो, पण चांदीचा भाव तर सोन्यापेक्षा अधिक वेगाने वधारत असल्याचे त्यांनी सांगितले. तरी पारंपरिकता म्हणून थोडे-थोडके सोने खरेदी यंदाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. त्या उलट ‘बॉम्बे बुलियन असोसिएशन’चे नवनिर्वाचित अध्यक्ष आणि रिद्धी सिद्धी बुलियन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक यांनी गेल्या वर्षाच्या तुलनेत भाव वाढला असतानाही जवळपास तिपटीने अधिक सोन्याला मागणी असल्याचे सांगितले. त्यांच्याकडून चालविल्या जाणाऱ्या सोन्याची ऑनलाइन खरेदी-विक्रीची बाजारपेठ ‘आरएसबीएल स्पॉट’शी मुंबई व परिसरातील दोन हजारांहून अधिक जवाहिर व किरकोळ विक्रेत्यांची संलग्नता आहे. आरएसबीएलचे संचालक मुकेश मेहता यांच्या अंदाजाप्रमाणे सोन्याच्या स्थिरावलेल्या भावाने यंदा दिवाळीतील सोने खरेदी ही केवळ मुंबई व आसपासच्या सराफ बाजारात ७०० ते ८०० किलोच्या घरात जाणारी असेल. अगदी सामान्यांनाही परवडावे म्हणून अगदी अर्धा ग्रामची नाणीही बाजारात उपलब्ध असून, शून्य घडणावळ खर्च आणि शुद्धतेबाबतही शाश्वती देणारे प्रमाणपत्र असल्याने ग्राहकांचा त्याकडे प्रतीकात्मक खरेदी म्हणून कल वाढला आहे. तर चांदीच्या भावातील घोडदौड पाहता गुंतवणूक म्हणून चांदीची मागणी उंचावत चालली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ■